- प्रकरण चौथे -

वामन होवाळ यांचे वाङ्‌मयीन व्यक्तिमत्व

पृष्ठ क्रमांक 42 ते 49

# प्रकरण चौथे

## वामन होवाळ यांचे वाङ्‌मयीन व्यक्तिमत्व

**परिचय :-**

वामन होवाळ हे अलीकडचे कथाकार त्यांचे 1973 ते 1988 या कालखंडात प्रामुख्याने "बेनवाड" (1973), "येळाकोट" (1982), "वारसदार" (1986) आणि "वाटा आडवाटा" (1988) असे एकूण चार कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत. वामन होवाळांची पहिली कथा 1963 मध्ये "कथालक्ष्मी" या मासिकात प्रसिद्ध झाली होती नि त्या कथेचं शीर्षक होतं "माणूस" नंतर मात्र वसुधा, सुदर्शन, कथालक्ष्मी, राजश्री, शामसुंदर, धनुर्धारी, यशवंत, अलका, साम्यवादी, सत्यकथा, अस्मितादर्श इत्यादी नियतकालिकातून त्यांच्या कथा प्रसिद्ध होऊ लागल्या.

**पुरस्कार :-**

वामन होवाळ हे मुख्यतः ग्रामीण कथालेखक म्हणून नावारूपास आले. "मजल्याचं घर" ही बेनवाड या पहिल्या कथासंग्रहामधील त्यांची कथा मराठी भाषेची चौकट मोडून कानडी भाषेत "महडी मने" व हिंदीत "दुमंजिला घर" या नावाने रूपांतरीत झाली आहे. त्यांच्या याच कथेचं नाव कानडी भाषेत प्रकाशित झालेल्या एका आंतरभारतीय कथासंग्रहाला दिले आहे. त्याचप्रमाणे याच कथेचा इंग्रजीमध्येही अनुवाद केला आहे. याशिवाय "येळकोट" मधील "पाऊसपाणी" या कथेचे फ्रेंच भाषेत भाषांतर झाले आहे. त्यांच्या "येळकोट" या कथासंग्रहाला महाराष्ट्र शासनाचा "राज्य पुरस्कार" तर अलिकडे प्रसिद्ध झालेल्या "वाटाआडवाटा" या कथासंग्रहास "अस्मितादर्श" पुरस्कार लाभला आहे. 17 व्या इंदूर येथील "अस्मितादर्श" मेळाव्याचे अध्यक्षपद म्हणजे त्यांना मिळालेले आणखी एक मानाचे पान आहे.

**ग्रामीण कथा :-**

वामन होवाळांच्या कथा हया प्रामुख्याने ग्रामीण आहेत. आपली कथा कशी जन्म घेते हे सांगताना ते लिहितात, 'मी लहान असताना, हायस्कूलमध्ये शंकर पाटील व्याख्यानाला आले. त्यांनी 'शेतक-यांचा राजा' ही कथा सांगितली त्यातून वाटायला लागलं की, हा माणूस जे कांही सांगतो आहे ते तर आपल्या जवळही आहे. आपल्यालाही तसं सांगता येईल, 'आपलं गांव, आपल्या अवतीभवतीची माणसं, त्यांचे स्वभाव यांची वागण्याची त-हा, आपले अनुभव हे सारं काही आपणांसही मांडता येईल आणि या जाणिवेतून एक एक प्रसंग माझ्या डोळयासमोर येतो आणि कथा जन्माला येते.'[1] वामन होवाळांच्या कथालेखनाच्या कालखंडामध्ये 1956 चे आंबेडकरकृत धर्मांतर, या धर्मांतरामुळे निर्माण झालेला ग्रामीण भागातील स्पृश्य विरुद्ध अस्पृश्य असा संघर्ष, औद्योगिकरण, साखर कारखान्यांची निर्मिती, ग्रामपातळीवर राजकारणात सत्ताप्राप्तीसाठी केलेले डावपेच, त्यातून निर्माण होणारे तिढे आणि या सर्वांबरोबरच पिढयानपिढया जतन करण्यात आलेली असहाय्य मानसिकता खुद्द वामन होवाळांच्या वाटयाला आलेली होती. ती त्यांनी भोगलेली होती. त्यातून त्यांचं मन घडत होतं मात्र असे असले तरी पारंपारिक ग्रामजीवन नि त्याविषयीची असणारी अस्मिता यानेही होवाळांचे मन संस्कारीत झालेले.

एकाच वेळी जुन्या आणि नव्या मूल्यांच्या प्रभावातून त्यांच्या व्यक्तिमत्वाला आकार प्राप्त झाला आणि यातूनच ग्रामीण वातावरणात रमणारी परंतु सामाजिक परिवर्तनाचा ध्यास बाळगणारी अशी त्यांची कथा आकारास आलेली, तात्पर्य ही सर्व परिवर्तने दलित साहित्याच्या प्रभावातून निर्माण झालेली होती. पण त्याअगोदर ग्रामीण कथेने रंजनप्रियतेचे जे टोक गाठले होते, तिला ग्रामीण किस्स्यांचे जे स्वरूप प्राप्त झाले होते, त्याच्याही प्रभावातून होवाळांचे व्यक्तिमत्व घडत होते. अशा प्रकारे एका समिश्र वातावरणाने होवाळांच्या कलात्मक मनाची जडण घडण होत गेली.

होवाळांच्या सुरवातीच्या लेखनात कुठे अनुकरणशीलता आढळणे स्वाभाविक असले तरी हळू हळू या कथालेखनाला आत्मजाणीव होऊन पुढे त्यांनी लोकांना खळाखळा हसविणारी कथा लिहितच गंभीर कथा लेखनही तेवढयाच तन्मयतेने केले आहे. या विषयी डॉ. रवा क-हाडे लिहितात, 'त्यांची कथा ही केवळ

ग्रामीण कथा अथवा केवळ दलित कथा अथवा केवळ विनोदी कथा नसते. ग्रामीणता, दालित्य आणि विनोद या तिहींचेही एकजीव झालेले रसायन त्यांच्या कथांत असते•[2] येळकोट नंतरच्या कथासंग्रहामध्ये अधिक सखोल व चिंतनाची लय त्यांना सापडल्याचे जाणवते.

वामन होवाळांची कथा ही विशेषतः ग्रामीण पार्श्वभूमीवर घडत असली तरी तेवढयाच जोमाने ते शहरी दलित कथाही पेलताना दिसतात. येळकोट (येळकोट, जयंती, दलदल (वारसदार) वाटा आडवाटा (वाटाआडवाटा) या कथा शहरी जीवनातील दालित्याचे चित्रण सूक्ष्म जाणीवांसह घडविताना दिसतात. वामन होवाळ आपल्या कथांतून प्रामुख्याने ग्रामीण भागातील दलित व दलितेतर यांच्या जीवनचित्रणाबरोबर उपहासात्मक व उपरोधात्मक विनोदाचे अंगाने ते माणसांच्या वृत्ती प्रवृत्तीवर प्रकाशझोत टाकतात. आपल्या कथांतून व्यक्तिजीवनाच्या व्यंगावर मार्मिकपणे बोट ठेवून त्यातील सामाजिकतेचे व सांस्कृतिकतेचे दर्शन प्रभावीपणे घडवितात. ते आपल्या कथांतून सामाजिक प्रश्नांचे केवळ चित्रणच करीत नाहीत तर चिंतनही व्यक्त करतात. त्यांची कथा मूल्यभाव होऊन आलेली असते. त्यांच्या कथेचा आशय हा समाजाभिमुख असतो.

कथनशैली :-

वामन होवाळांच्या कथेचे अंगभूत वैशिष्टय म्हणजे कथानिवेदन अगदी सहज, सोप्या प्रवाहीपणे करणे हे होय, या निवेदनपद्धतीत एक प्रकारची नाटयात्मकताही असते तर काही वेळा संवादात्मक पद्धतीचा उपभोगही भरपूर प्रमाणात केल्याचे दिसून येईल. वामन होवाळ कथेतील घटना आणि प्रसंग यापासून पूर्णतः अलिप्त राहून कथा निवेदन करताना जाणवते मात्र हे निवेदन कथनपद्धतीशी जवळीकता साधणारे असते. ते कथानिवेदन संयमितपणे नि प्रवाहित्वाने केलेले असल्यामुळे त्यात भडकपणा किंवा प्रचारकीपणा असला प्रकार त्यांच्या कथेत कुठेही आढळत नाही कारण ती ख-या अर्थाने 'कथनशैली' असते.

विनोदी कथा :-

दलित कथेवर एक आरोप केला जातो तो म्हणजे 'दलित कथा साहित्य हे उसासे, अश्रू, संताप,

आक्रोश यांनीच प्रामुख्याने भरले आहे. पण ते साहजिकच आहे. कारण दलितांचे जीवनच मुळात दुःखमय आहे. त्यामुळे तिथे विनोद कसा भेटेल. मात्र याला वामन होवाळांची कथा अपवाद आहे. त्यांचा मूळ पिंडच विनोदी लेखकाचा. विनोद, व्यंग्य, उपरोध, उपहास यांनी नटलेली त्यांची कथा आहे. होवाळांचा विनोद हा त्या कथेतील व्यक्तीवर जबरदस्तीने लादलेला विनोद नसतो. त्यामुळे तो अत्यंत स्वाभाविक वाटतो. खदखदून हसविणे हा त्यांचा धर्म नव्हे. इंदूमती शेवडे लिहितात, "ग्रामीण जीवनातील दलितांचे दारिद्र्य, दुःख व दुःस्थिती त्यांच्या डोळयांना दिसत नाही असे नाही. मोठया माशाने लहान माशाला खायचे, चतुराने भोळयांना लुटायचे, वरच्याने खालच्याला छळायचे हे सारे प्रकार त्यांच्या परिचयाचे आहेत. पण ते हे प्रकार व्यंगात्मक विनोदातून दाखवितात."[3] तात्पर्य कथेमधील व्यक्तिरेखांच्या हालचाली, त्यांची बोलीभाषा, विचार करण्याची पद्धती, प्रसंग या सर्वातून हा विनोद जन्म घेतो. बोलीभाषेतील ग्रामीणता, ढब, हा या विनोदाला पोषकच ठरतो. दुःखप्रद अनुभव ते व्यंगात्मक रीतीने मांडण्याचा प्रयत्न निश्चितच वाखाणण्यासारखा आहे. विशेषतः खेडयातील गरिब, सोशीक माणसांबरोबर तिथली बेरकी, इरसाल, टगी, छिनाल, टोणगी माणसे ते रंगवितात. तसेच उपहासात्मक व उपरोधात्मक विनोदाचे अंगाने ते माणसांच्या वृत्ती प्रवृत्तीवर प्रकाशझोत टाकतात. दलित कथा वाङ्‌मयात विनोदी कथा लिहिण्याचा पायंडा होवाळांनी घातलेला आहे. डॉ. प्रकाश कुंभार म्हणतात, "विनोदाच्या माध्यमातून रूढीग्रस्त मानवी मन व त्यातील विरूपतेचे प्रत्ययकारी दर्शन आपल्या कथांतून घडवितात."[4] समाजातील बेगडीपणा, ढोंगी प्रवृत्ती उलगडून दाखविणे ही त्यांच्या विनोदी लेखनाची एक जमेची बाजू होय.

**भाषा :-**

वामन होवाळांच्या कथेतील भाषा ही विशेषतः ग्रामीण परिसरातील आहे. मात्र होवाळांचे व्यक्तिमत्व विनोदी असल्याकारणाने त्यांच्या कथेतील भाषेला आगळे वेगळे सौंदर्य प्राप्त होते. "भोवतालच्या जीवनातील विसंगती व वैगुण्ये नोंदवत असताना प्रसंगाच्या माध्यमातून उपहासात्मक व उपरोधात्मक व विनोदी भाषेचा वापर ते करतात. व्यक्तीच्या अंतरंगातील विसंगतीची गुंतागुंत अत्यंत समर्थपणे व कलात्मकदृष्टया चित्रित करतात."[5] त्यांच्या कथेतील भाषा ही सांगली भागातील आहे. निवेदनामध्येही त्या भाषेचा ढंग

होवाळ आणतात. कथेचा विनोदात्म सूर निर्माण करण्याच्या दृष्टीने ते भाषेचा योग्य प्रकारे वापर करतात. उदा. "खरंच आपल्या नव-याला चार पायताणं उडवावीत असं शामूच्या बायकोला वाटत होतं। पण नव-याच्या जातीला पायताणांन हाणावं तरी कसं। असा विचार करून ती एकदा चप्पलकडे आणि एकदा शामूकडे पाहू लागली." (अक्कलहुशारी).

लोकजीवनातील म्हणी, प्रतिमा, उपमा, वाक्प्रचार यांचा होवाळ सहजगत्या यथायोग्य वापर करतात. त्यांच्या उपमाही खास ग्रामीण असतात. उदा. "त्याने कुसाबाईला मैढीगत लडा लडा हलवलं, "नववा महिना लागलेल्या बाईच्या पोटासारखं आभाळ लोंबकळू लागलं." म्हणी आणि वाक्प्रचारसुद्धा असेच सापडतील, "देणं ना घेणं अन् कंदील लावून येणं", " ते गांव गेलं टिप्परीत अन् पाऊस गेला उडत।", "तुजा मुडदा गाडला बरा हया आब्याचा", "तुमी का तिथं अडचणीत दोडकं पेराय गेलाय", "लाल्या धक्का लागलेल्या किडयासारखा आकसला", "दत्तू बिघडलेल्या गॅस बत्तीसारखा फुरफुरत होता", "दाजीबा, तुमी बरं आयत्या बाजल्यावर बाळातीण हयुयाला आलाय।" अशी अनेक उदाहरणे त्यांच्या कथांत जागोजागी सापडतात. तसेच "टाईम", "थेटर", "इंटरफेर" असे इंग्रजी शब्द मधेमध्ये येताना दिसतात. एकूण त्यांची भाषा ही खास ग्रामीणतेचा ढंग असलेली व कथेचा उपहासात्मक व उपरोधात्मक सूर निर्माण करणारी आहे.

**पात्र चित्रण :-**

वामन होवाळांच्या कथांतील पात्रांचा विचार करताना प्रथम एक गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे. बागूलांच्या नंतरच्या पिढीतील दलित कथाकारांच्या कथेपेक्षा ती वेगळी आहे कारण वामन होवाळ आपल्या कथांतून दलित व दलितेतरांचे चित्रण करतात, ही व्यक्तिचित्रणे उद्दाम, इरसाल, बेगडी, सत्तांध, मुजोर असतात. याशिवाय अंधश्रद्धा, भोळी आणि सर्वसामान्यामध्ये भांडण लावून आपला स्वार्थ शोधू इच्छिणारी आहेत. ग्रामजीवनातील शोषण रंगवितांना त्याला मुद्दामहून कोणताही रंग देत नाहीत. त्यांच्या कथेतून प्रकट होणारे व्यक्तिदर्शन विविधरंगी, विविध ढंगी आहे. ही पात्रे आशावादी असतात, जरी त्यांचा स्वभाव इथल्या परिस्थितीने घडविलेला असला तरी ती परिस्थितीच्या हातातील बाहुली नसतात. परिस्थितीवर मात करण्याची धडपड करीत असतात. आपल्या अक्कलहुशारीतून त्यावर मार्ग काढतात. ती कधी यशस्वी होतात तर कधी

"करायला गेलो एक" या धर्तीवर गोत्यातही येतात. हे चित्रण वामन होवाळ तटस्थवृत्तीने करताना दिसतात. लेखकपणाच्या व्यापक भूमिकेतून त्यांनी कथालेखन केलेले आहे. माणसाविषयी आस्था व व्यापक सहानुभाव यांतून त्यांनी दलितांच्याबरोबर दलितेतरांचे चित्रण केलेले आहे ते आपल्या कथेतील माणसाविषयी म्हणतात, "कथेतील माझी म्हणून काही माणसं असतात त्यांची टवाळी करावी, त्यांना विद्रूप बनवावं, असं माझी लेखणी करत नाही कारण हया माणसांवर माझा जीव असतो.... एखादी आई आणि तिचं उघडंनागडं, आखूड, अपु-या नाकाच पोरं हयांच्यातील प्रेमाइतकाच माझा आणि कथेतल्या माणसांचा जिव्हाळा आहे. त्या ओबड-धोबड माणसांची मला कधी लाज वाटत नाही. चार माणसांत मला त्यांनी गाठलं तर मला ती नकोशी वाटत नाहीत. अथवा "न्युअसन्स" अशीही भासत नाहीत त्यामुळे आपली किंमत कमी होतेच असा न्यूनगंड मनात उभारी धरत नाही."[6] येथे दलित, दु:खित, पिडिताविषयी कणव व्यक्त झालेली दिसते. या कथेतून ते कथांमधून व्यक्तींचे चित्रण करतात आणि अंधश्रद्धा, रूढी, परंपरा यांनी भारावलेल्या ग्रामीण व शहरी भागातील दलित व दलितेतर माणसांच्या वृत्तिप्रवृत्तीचा प्रामुख्याने वेध घेतात, हा वेध त्यांनी उपहासात्मक व उपरोधात्मक विनोदाच्या माध्यमात अनेकदा वापर केलेला दिसून येतो.

**कथासंग्रहांचा परिचय :-**

**बेनवाड :-** वामन होवाळांच्या "बेनवाड" या पहिल्या कथासंग्रहावरून "वाटा आडवाटा" कथासंग्रहाकडे पाहिल्यावर काही गोष्टी सहज जाणवतात. "बेनवाड" या कथासंग्रहात ग्रामीण जीवनातील अंधश्रद्धा, रूढी, परंपरा यांनी उध्वस्त होणारे दलित जीवनाचे चित्रण, धर्मांतरानंतरही दलितांवर सवर्ण कसे अत्याचार करतात याचे चित्रण. जयंतीमधील संघर्ष, देव, अंधश्रद्धा, भावाभावातील ताणतणावाचे चित्रण, माणसांची विविध अंगे, उपहास, उपरोध यांचे विनोदी शैलीने चित्रण, किस्सेवजा चित्रण जास्त प्रमाणात असल्याचे दिसते.

**वारसदार :-** "वारसदार" मध्ये बौद्ध महाराऐवजी हिंदू महार मुलाच्या दाखल्यावर नोंद करून घेण्यासाठी धडपडणारा स्वार्थी सदा व त्याला विरोध करणारा अडाणी थोरला भाऊ यांचे चित्रण आहे.

**वाटा आडवाटा :-** "वाटा आडवाटा" मध्ये एकूण दहा कथा आहेत. त्यापैकी दोन-तीन कथाच काय त्या पूर्णांशाने दलित इतर सर्व ग्रामीण आहेत. त्यातील नेहमीचे दलितपणाचे, आक्रस्ताळे वर्णन, विवेचन किंवा

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

विशिष्ठ मूल्यबद्ध समर्थन नाही. मानवनिर्मित बांध, बंधनांच्या पलीकडील माणूसपणाचा, त्यातील उत्कृष्ठ पार्थिवतेचा वा नाजुक आलेख लेखकाने काढला आहे तो विशेष कलात्मक नसला तरीही, अव्वल, वास्तव व कसदार आहे. लेखकाची मूळ जीवननिष्ठा एवढी अभंग अव्यभिचारी आहे की, तो तुकडया तुकडयांचे जोडकाम केलेला वाकळेचा बहुरंगी आकार-प्रकार म्हणून जीवनाकडे पहात नाही. त्याला होणारे जीवनदर्शन हे सम्यक, संपूर्ण व साक्षात्कारी असेच आहे. डॉ. तारा भवाळकर म्हणतात, "होवाळांची कथा ही प्रामुख्याने कथनासाठीच निर्माण झाली असल्याचे जाणवते. त्यामुळे ती घटनांची रंगत वाढवते, नाटयपूर्ण संवादातुन पुढे सरकते पण कदाचित म्हणूनच अनुभवाचा पुरेसा तळ अजूनही ती गाठू शकलेली नाही."[7] कथनशैलीच्या लेखनामुळे ही असेल कदाचित, पण होवाळांच्या कथेने बोलीचा अस्सल रसरशीतपणा मात्र जपला आहे. दीर्घकाळ महानगरात राहूनही बोलीचे चैतन्य जपण्याची किमया आणि मातीच्या अनुभवाची तळ गाठू पाहणारी होवाळांची आसोशी दुर्मिळ आणि अपूर्व आहे.

वामन होवाळांचे वाङ्.मयीन व्यक्तित्व हे समर्थ कथाकाराचे व्यक्तिमत्व आहे. त्यामुळे दलित कथा साहित्यात आपले आगळे स्थान राखून आहे.

पुढील प्रकरणात 'येळकोट' कथासंग्रहमधील स्वभाव रेखाटनांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

संदर्भ :-


1. वामन होवाळ, "माझ्या कथेतील माणसे माझी"
अस्मितादर्श, वर्ष 11 अं.1 (गा.फे.मा.1978) पृ. 50

2. सदा क-हाडे, "येळकोट" वामन होवाळ यांचा अपेक्षा वाढविणारा कथासंग्रह"
मुंबई सकाळ (रविवारची पुरवणी) 26.6.1983, पृ.4

3. इंदूमती शेवडे, "मराठी कथा, उमग आणि विकास"
मुंबई सुधारित आवृत्ती 1982, पृ. 381

4. प्रकाश कुंभार, "दलित कथासाहित्य", कोल्हापूर, पृ. 205

5. उ. नि. पृ. 242

6. वामन होवाळ, "माझ्या कथेची जडणघडण",
अस्मितादर्श, दिवाळी अंक 1986, पृ. 166

7. तारा भवाळकर, "घटनांची रंगत वाढविणारी कथा",
कोल्हापूर सकाळ (रविवारची पुरवणी) 2.4.1989, पृ.4


- - - -